नव राष्ट्र

पुणे, सोमवार, दि.१९ जुलै २०२१

परिसंवाद — डॉ. रामचंद्र देखणे यांचे मत, भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषद

# धर्माने विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलविला

**पुणे,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. "धर्माने विज्ञानाकडे पाहण्याची दृष्टी बदलविली. पण ही दृष्टी परिवर्तन करण्यासाठी संत साहित्याचे खूप मोठी योगदान आहे. ज्या दिवशी संत साहित्याकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोण बदलेल त्यावेळेस तत्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले याचे उत्तर मिळेल,"असे मत संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या तिसऱ्या दिवसाच्या ' आमच्या तत्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले? ' या विषयावरील पाचव्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यावाचस्पती व संतसाहित्याचे अभ्यासक हभप तुकाराम महाराज गरुड ठाकुरबुवा दैठणेकर हे होते.



यावेळी हरिद्वार येथील परमपूज्य अनंतश्री विभूषित महामंडलेश्वर श्री श्री १००८ ईश्वरानंद ब्रह्मचारी,उत्तमस्वामीजी महाराज, संस्कृतचे गाढे अभ्यासक पंडित वसंत गाडगीळ, साहित्य संस्कृत मंडळचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, मराठवाडा विकास महामंडळाचे सचिव डॉ. विजयकुमार फड आणि संत निवृत्तीनाथ महाराज संस्थानचे माजी अध्यक्ष ह.भ.प. संजय महाराज धोंडगे, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, कुलसचिव डॉ. प्रशांत दवे आणि डॉ. संजय उपाध्ये आदी उपस्थित होते.

डॉ. रामचंद्र देखणे म्हणाले," धार्मिक हा सांप्रदायीक शब्द आहे. संत साहित्यात धर्म हा शब्द आलेला आहे. परंतु ते कालानुरूप वेगवेगळ्या अर्थाने त्यांना मांडण्यात आले आहे. पाश्चात्यात धर्म शब्द तेवढा रूढ नाही. आपल्याकडे धर्म हा सांप्रदायिक झाला. नियम, कर्तव्य, आचार हे धर्माचे खरे तत्व त्यालाच वैश्विक धर्म असे ही म्हणू शकतो.

संतांनी स्वधर्माला धर्म असे संबोधिले आहे. सर्वातून मुक्त झालेला विवेकवाद म्हणजे धर्म. साहित्याचा अभ्यास केल्यास संत हे पुरोगामी,भावदर्शी, विज्ञानवादी विचारांचे दिसतात. सर्व संतांचे साहित्य हे भगवत गीतेवर आधारित आहे. राज्यामध्ये ज्या वेळेस सुधारकवाद्यांची परंपरा निर्माण झाली. त्यानंतर साहित्याच्या ओघात तत्वज्ञ संत झाले. तसे पाहिले तर तत्वज्ञ हे वेगळे आहेत आणि पूजनीय आहे ती भक्ती."

> "पाश्चात्यांमध्ये वेगवेगळ्या धर्मामध्ये तत्वज्ञानाचा अधिक प्रभाव दिसतो . या देशात वेदाला धर्म मानायचे का नाही एक प्रश्न आहे . गीतेमध्ये धर्माला वेगवेगळ्या अर्थाने मांडल्या गेले आहे . त्यात सर्वोत्कृष्ट धर्म म्हणजे परमात्माचे रक्षण करणे. संतांचा भागवत धर्म आहे . त्यानुसार त्यांनी आपले तत्वज्ञान जगासमोर मांडून मानव कल्याणाचे व रक्षणाचे सार्थ सांगितले आहे . त्यामुळेच असे म्हणता येईल की समाजातील एका वर्गाने संतांना धार्मिक केले आहे ."
>
> –डॉ . सदानंद मोरे, अध्यक्ष

## ...तर संपूर्ण मानवजातीचा खरा विकास होईल

ठाकुरबुवा म्हणाले," धर्म हा शब्द कर्तव्य प्रदान आहे . संतांचे वाड़्मय हे सर्व जगाचे कल्याण करणारे आहे . त्यांनी कधीच एका घटकाचा नाही तर संपूर्ण मानवजातीच्या सुखाचा विचार केला आहे . आज मानवाने जी वैज्ञानिक प्रगती केली आहे ती विनाशाकडे घेऊन जाणारी आहे . त्याने मानवी मनाचे अधपतन केले आहे . मणुष्यामध्ये जेव्हा विकार वाढतातेव्हा त्यावर नियंत्रण कसे मिळवावे हे गीता शिकविते . त्यामुळेच विज्ञानपेक्षा अधात्माचा विकास हाच सृष्टीचा व संपूर्ण मानवजातीचा खरा विकास करेल ."

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**

बातम्यांचा राजा
जनप्रवास
पुणे, सोमवार, दि.१९ जुलै २०२१

# धर्माने विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलविला

पुणे
जनप्रवास प्रतिनिधी

- विद्यावाचस्पती व संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांचे मत
- पहिल्या भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेच्या पाचव्या सत्रात



धर्माने विज्ञानाकडे पाहण्याची दृष्टी बदलविली. पण ही दृष्टी परिवर्तन करण्यासाठी संत साहित्याचे खूप मोठी योगदान आहे. ज्या दिवशी संत साहित्याकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोण बदलेल त्यावेळेस तत्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले याचे उत्तर मिळेल. असे विचार विद्यावाचस्पती व संतसाहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या तिसर्या दिवसाच्या ' आम च्या तत्वज्ञ संतांना धार्मिक कोणी ठरविले? ' या विषयावरील पाचव्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यावाचस्पती व संतसाहित्याचे अभ्यासक ह.भ.प. श्री तुकाराम महाराज गरुड ठाकुरबुवा दैठणेकर हे होते.

यावेळी हरिद्वार येथील परमपूज्य अनंतश्री विभूषित म हामंडलेश्वर श्री श्री १००८ ईश्वरानंद ब्रह्मचारी श्री उत्तमस्वामीजी महाराज, संस्कृतचे गाढे अभ्यासक पंडित वसंत गाडगीळ, साहित्य संस्कृत मंडळचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, मराठवाडा विकास महामंडळाचे सचिव डॉ. विजयकुमार फड आणि संत निवृत्तीनाथ महाराज संस्थानचे माजी अध्यक्ष ह.भ.प. संजय महाराज धोंडगे हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित होते.

पुरोगामी विचाराचे
एकमत
लातूर, सोमवार, दि.१९ जुलै २०२१

# सात्विक आहाराने आत्मोन्नती : डॉ. तांबे

**पुणे** : तुकाराम महाराज सांगतात की, स्वकष्टातून खाल्लेले अन्न हे शरीरासाठी योग्य आहे. अन्नाचा संबंध हा मन आणि मेंदू यांच्याशी आहे. पवित्र जागेत परमेश्वराच्या नामस्मरणाने भोजन केल्यास आत्मोन्नती होते. एकंदरीतच संतांनी आरोग्यासंदर्भात जे काही सांगितले त्याचे पालन केले तर सर्वांना सुख व शांती मिळेल असे विचार आत्मसंतुलन व्हिलेजचे संस्थापक डॉ. बालाजी तांबे यांनी व्यक्त केले.



एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या तिसऱ्या दिवसाच्या 'संत आणि आरोग्य व्यवस्थापन' या विषयावरील चौथ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नेत्ररोगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने हे होते. यावेळी ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. मुकुंद महाराज जाटदेवळेकर उपस्थित होते. तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते.

यावेळी डॉ. लहाने यांनी 'उत्तम आरोग्यासाठी शुद्ध शाकाहार, व्यायाम, संतुष्टता, योग्य निद्रा, सहनशक्ती आणि चिंतामुक्त जीवन असावे, असे म्हटले. प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान आणि प्राणिमात्रांचा विचार आमच्या संतांनी केला आहे. संतांनी मानवी कल्याणासाठी जे तत्त्वज्ञान सांगितले, त्याचे अनुकरण केल्यास संपूर्ण मानवजातीला सुख-समाधान आणि शांती मिळेल. डॉ. शैलश्री हरिदास यांनी स्वागतपर भाषण केले. महेश महाराज नलावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रोहिणी काळे यांनी आभार मानले.

तरुण भारत
नागपूर, सोमवार, दि.१९ जुलै २०२१

# सात्त्विक आहाराने आत्मोन्नती होते : डॉ. बालाजी तांबे

◆ **वाशीम, १८ जुलै**

जगद्गुरू तुकाराम महाराज सांगतात की, स्वकष्टातून खाल्लेले अन्न हे शरीरासाठी योग्य आहे. अन्नाचा संबंध हा मन आणि मेंदू यांच्याशी आहे. पवित्र जागेत परमेश्वराच्या नामस्मरणाने भोजन केल्यास आत्मोन्नती होते. एकंदरीतच संतांनी आरोग्यासंदर्भात जे काही सांगितले त्याचे पालन केले तर सर्वांना सुख व शांती मिळेल, असे विचार आत्मसंतुलन व्हिलेजचे संस्थापक डॉ. बालाजी तांबे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'च्या तिसऱ्या दिवसाच्या 'संत आणि आरोग्य व्यवस्थापन' या विषयावरील चौथ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.



अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने होते. यावेळी संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अर्जुन महाराज लाड, कीर्तनकार मुकुंद महाराज जाटदेवळेकर, बाळासाहेब बडवे, संत साहित्याचे अभ्यासक ज्ञानेश्वर महाराज माळी आणि डॉ. विश्वास सापत्नेकर हे वक्ते म्हणून उपस्थित होते. तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड आणि डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते.

डॉ. बालाजी तांबे पुढे म्हणाले की, समर्थ रामदास स्वामी यांनी अन्नाला पूर्णब्रह्म असे संबोधले आहे. वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे हा श्लोक म्हणून अन्नाचे सेवन केल्यास आपले जीवन निरोगी राहण्यास मदत होईल. त्यामुळे मेंदूत सकारात्मक भाव निर्माण होतात. तामसी अन्न हे सदैव रोग निर्मिती करतात असे ते म्हणाले.

संतांनी उपवासाला ही महत्व दिले आहे. त्याचे कारण म्हणजे याकाळात आपली शक्ती परेश्वराचे चिंतन करण्यासाठी लावावे. यामुळे शरीरातील विषाणू नष्ट होतात. संताच्या वाङ्‌मयाचे अध्ययन केल्यास असे दिसते की मानवाचे आरोग्य उत्तम राहिल्यास हे जग नीट चालेल, सुव्यवस्था निर्माण होईल आणि मनुष्य हा मनुष्याचा आदर करेल. चांगले कर्म झाले तरच आत्मोन्नती होईल असे त्यांनी ठासून सांगितले.

प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि प्राणीमात्रांचा विचार आमच्या संतांनी केला आहे. संतांनी मानवी कल्याणासाठी जे तत्त्वज्ञान सांगितले, त्याचे अनुकरण केल्यास संपूर्ण मानव जातीला सुख-समाधान आणि शांती मिळेल. त्याचबरोबर त्यांनी मनाच्या शास्त्राचे रहस्यही संपूर्ण मानवजातीसमोर मांडले.

ज्ञानेश्वर महाराज माळी म्हणाले, संत साहित्याचा अभ्यास करतांना दिसते की त्यांचा आयुर्वेदाशी मेळ आहे. वारीला जातांना विठ्ठलाचा जो गजर केल्या जातो, त्यामुळे शरीरात स्पंदने तयार होवून ह्रदयाचे आजार कमी होतांना दिसतात. तसेच, शुध्द बीजा पोटी फळे रसाळ गोमटी ही ओवी सांगून जाते की गर्भसंस्कार करतांना कसे संस्कार केले गेले पाहिजे.

डॉ. शैलश्री हरिदास यांनी स्वागतपर भाषण केले. महेश महाराज नलावडे यांनी संचालन केले. डॉ. रोहिणी काळे यांनी आभार मानले.

*(तभा वृत्तसेवा)*